

कवी - सचिन काकडे

# निरोप

ई साहित्य प्रतिष्ठान


“आले होते” सांग त्याला..!!
ती उंब–याला सांगुन गेली
पाहिले न मी तिला
ती मला पाहुनी गेली

घर एकांताचे झाले
उंब्‍-यावर अंगण रुसले
निजभरल्या आभाळाच्या
डोळ्यात हे अंजन कसले?




लहरी मागुनी लहरी
थैंबातुनी फुटली हाक
व्याकुळ सरीत उधळला
वा-याचा ओला धाक


तिन गाव सोडला आता
दारात म्हणाली वीज
क्षणभर घेउनी श्वास
ये कुशीत माझ्या नीज



मग गहिवरलेली माया
अन गुदमरणारा काळ
त्याच्याही ओठी आला
शब्दांचा नुसता जाळ


ही जन्मभराची आग
उंब-याशी निरांजन जळते
मज त्याची लख्ख कविता
ते विझल्यानंतर कळते

या ई-बुकाचे सर्व हक्क कवी सचिन काकडे यांच्याकडे सुरक्षित

संपर्कासाठी पत्ता s.s.kakade@gmail.com मोबाईल – ९५९४५६६६७६



डिझाईन –

***Last Bench Designs***

प्रकाशक –

ई-साहित्य प्रतिष्ठान

**www.esahity.com** esahity@gmail.com